# भारतात मानवी अधिकाराचा विकास आणि जागतिकीकरणाचे परिणाम

प्रा.डॉ. वकील टी. शेख
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोराडी.

प्रस्तावना :–मानव हा जन्मजात समाजप्रिय प्राणी आहे. मानव व समाज यांच्यातील संबंधच मानवाच्या अधिकाराची जाणीव करून देतात. मानव अधिकार असे अधिकार आहे की, ते मानवाला जन्मतःच प्राप्त होतात. मानवाच्या प्रदत्त अधिकारांचा समावेश कोणत्या संविधानात असो वा नसो मानवाचे सर्व अधिकार अबाधित राहणार. जीवन, स्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठा हे मानव अधिकाराचे मुळ आहे. आधुनिक भारताने हा विचार स्विकारला आहे. त्यादृष्टीने मानव अधिकार म्हणजे काय? मानवी हक्क मानवाला जन्मजात असतांना मानव अधिकारासंबंधी जागतिक स्तरावर व भारत सरकार तर्फे एवढे महत्व का दिले जावे असा प्रश्न सामान्याच्या मनात येत असतो. तेव्हा यांच प्रश्नाची उकल करण्यासाठी प्रस्तुत संकल्पनेचा विचार होणे आवश्यक आहे.

मानवी अधिकाराचा विकास :–मानवी अधिकाराचा अर्थ व्यवस्थित कळावा यासाठी मानव अधिकाराची परिभाषा पुढील प्रमाणे देत आहोत. वंश, जात, रंग, लिंग, राष्ट्रीयत्व भाषा, याशिवाय मानव प्राण्यांना मिळालेले अधिकार म्हणजे मानवी अधिकार. याला मुलभूत किंवा नैसर्गिक हक्क किंवा अधिकार असेही म्हणतात. हे वैश्विक हक्क आहे ते सर्व स्त्री–पुरूषांना लागू पडतात. भारतीय संस्कृती अतिशय प्राचीन असुन जवळजवळ पाच हजार वर्षाचा इतिहास या संस्कृतीला लाभला आहे. असे असले तरीही तत्कालीन प्राचीन रूढी व परंपरा आजही अव्याहतपणे भारतीय माणुस जोपासतो आहे. भारतातच्या प्राचीन इतिहासात नितीमत्तेला अतिशय महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. 'प्राचीन भारतीय संस्कृती' या संकल्पनेमध्ये 'धर्म' या शब्दाचा अर्थ सामाजिक व्यवस्थेच्या रूपाने मानवी हिंदू संकल्पनेमध्ये आधुनिक मानव अधिकाराचे विज विराजमान आहे.

मानवधिकारांच्या स्वरूपाने नीट आकलन होण्यासाठी इतिहासाचे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अशा तीन कालखंडात विभाजन केल्यास मानव अधिकारांचा विकास कसकसा होत गेला याचे विवेचन करता येईल.

प्राचीन भारत :–प्राचीन भारताच्या इतिहासात सनातन धर्माचा उल्लेख येतो. सनातन धर्म या संज्ञेत राज्यातील नितिमत्ता व धार्मिकता यांना प्राधान्य क्रम होता. सभा व समिती हया राजकीय संघटनांमार्फत राज्याच्या वाढत्या सामर्थ्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्यात येत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राजा जुलमी, अत्याचारी होणार नाही असे अपेक्षित होते. एकंदरीत तत्कालीन राजे नीतीच्या, परंपरेच्या चौकटीत राहून स्वतःला प्रजेचा सेवक समजून राज्यकारभार करीत होते.वेद, वेदांत, उपनिषद, गीता ही ग्रंथ आत्म्यावर विशेष लक्ष केंद्रीत करीत होती. 'आत्मा एक आहे' व परमात्मा सर्व मानवात विराजमान आहे. अशी त्यांची मुळ विचारसरणी होती. भारतीय साहित्य केवळ धार्मिक विचारच व्यक्त करीत नव्हते तर सामाजिक जाणीवाची जाणीव करून देत होते. महाभारतात सांगितले आहे, मनुष्यापेक्षा मोठा कुणीही नाही. अशाप्रकारे 'मानवकल्याण' या भावनेतून मानवाधिकार या संकल्पनेचा विकास होत होता.

मौर्य सम्राट चंद्रगुप्ताचा प्रधानमंत्री कौटिल्य उर्फ विष्णगुप्त याने आपल्या 'अर्थशास्त्र' या राजकीय ग्रंथात राजा, त्याचे शिक्षण व कर्तव्याची जाणीव करून दिली. कौटिल्याने सांगितले की, प्रजेच्या कल्याणात राजाने कल्याण समाविष्ट आहे. सम्राट अशोकाचा राजकारभार दया, क्षमा, शांती, मानवता व प्रेम या मानवीय सिद्धांतावर आधारित होता.अशाप्रकारे प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये मानवी कल्याण हा शिर्ष बिंदू दिसत असला तरीही मानव अधिकाराची दुसरी बाजुही अतिशय काळीकुट्ट आहे. तत्कालीन चातुर्वण्य व्यवस्था श्रमविभागणीच्या तत्वातून निर्माण झाली असली तरीही ही व्यवस्था पुढील काळात ईश्वरी तत्वाशी जोडल्यामुळे पुढील काळात मोठाच अनर्थ घडला. त्याची फळे आजही आम्ही भोगतो आहे.

मध्ययुगीन भारत :–मध्ययुगीन भारततही मानवी अधिकार व्यक्ती विकासाला प्रेरक होता. मुस्लिम विद्वान व विचारवंत अब्अजीज यांच्या मते मुस्लिम परंपरेनुसार 'मानवी कल्याण' केंद्रबिंदू समजून मानवी अधिकाराचा विकास झाला. सम्राट अकबराने 'दीने इलाही' या नव्या धर्माची स्थापना करून जनतेला सर्व धर्म समभावाची शिकवण दिली. मध्यकालीन भक्ती आंदोलन एक समतावादी मानवीय आंदोलन होते. तत्कालीन मतभेद नाकारून सर्वांवर प्रेम करा ही भक्ती आंदोलनाची शिकवण होती.

आधुनिक भारत :–मध्यकालीन जूनाट प्रथा व परंपरा नष्ट करण्यासाठी राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, विवेकानंद, ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा सामाजिक सुधारकांनी मानवी कल्याणासाठी आंदोलने चेतविले. देश–विदेशातील सुधारणावादी आंदोलनाने प्रभावित होऊन 1928 च्या नेहरू रिपोर्ट मध्ये व कराची प्रस्तावामध्ये मानव अधिकाराची संकल्पना मांडण्यात आली. भारताच्या स्वातंत्र्य लढयात आंदोलनकर्त्या क्रांतिकारकांचा दृष्टीकोन अधिकाराबरोबर कर्तव्याची जाणीव करणारा होता. भारतीय विचारवंत व सुधारकांनी प्रत्येक मनुष्याचे हित सामाजिक हितामध्ये समाविष्ट आहे. असे

आवर्जुन सांगितले. भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाने सदैव शोषणाच्या विरूद्ध संघर्ष केला. राष्ट्रीय आंदोलन मानवतेसाठी संघर्ष होता.

भारतीय घटना व मानव अधिकार :–स्वतंत्र भारताच्या नीति–निर्मात्यांनी व नेत्यांनी कल्याणकारी राज्याचा सिद्धांत घटना निर्मित करतांना स्विकारला आहे. सामाजिक, राजकीय व आर्थिक विषमता नष्ट करणे मानवी अधिकारांसाठी आवश्यक असल्याचे घटनाकारांनी मान्य केले होते. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर भारताच्या नवनिर्माणासाठी 26 जानेवारी 1950 रोजी स्वतंत्र भारताची नवी घटना अस्तिवात आली व भारत एक प्रभुत्व संपन्न व प्रजासत्ताक राष्ट्र बनले. मानव अधिकार शिर्षस्थानी ठेवून भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्विकार केला. घटनेत नागरिकांना मुलभूत अधिकारांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. स्वातंत्र्य, समता, धार्मिक स्वातंत्र्य, संस्कृती, संपत्ती, शोषणाविरूद्ध व घटनात्मक उपायांचा अधिकार अशाप्रकारे विविध अधिकार मानवाच्या मुलभूत अधिकारात समाविष्ट करण्यात आले आहेत. या अधिकारांचा कोणाकडून भंग झाल्यास न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याशिवाय सर्वांना मतदानाचा अधिकार, बहुराजनीतिक दल आणि कायद्याचे राज्य ही तीन वैशिष्टे आमच्या लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. सक्रीय न्यायपालीका, मुद्रण स्वातंत्र्य आणि आदर्श जनमत भारतीय लोकशाहीचे रक्षक व प्रहरी आहेत.

अशाप्रकारे आमच्या देशाची शासनव्यवस्था लोककल्याणकारी व मानवकल्याण हे ब्रिद जोपासणारी असली तरीही भारताच्या विभिन्न क्षेत्रात मानव अधिकारांचे उल्लंघन व हिंसाचाराच्या बातम्या मधुनमधुन झळकत असतात. भारताच्या लोकसंख्येपैकी बरीचशी लोकसंख्या गरीब व अशिक्षित आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी, संवेदनहीन व विध्वसंतेशी लोकांकडून या वर्गाचे प्रचंड प्रमाणात शोषण होत असते. या बाबींकडे प्रत्येक व्यक्तीने समजाने व शासनाने विचार करून तोडगा काढणे आवश्यक आहे. कारण सर्वांच्या सहकार्याशिवाय हे कार्य करणे शक्य नाही एक व्यक्ती काहीही करू शकत नाही.

जागतिकीकरणाचे भारतीय समाजावरील परिणाम :–भारताने सन 1991 पासुन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल सुरू केली. सन 1991 मध्ये देशाची अर्थव्यवस्था अत्यंत बिकट बनली होती. देशाची या आर्थिक संकटातून सुटका करण्यासाठी आणि देशाचा अर्थव्यवस्थेची घटी व्यवस्थित बसविण्यासाठी पी.व्ही. नरसिंहराव सरकारने सन 1991 मध्ये नव्या आर्थिक धोरणाचा म्हणजेच जागतिकीकरण करण्याचा महत्वपुर्ण निर्णय घेतला.

परंतू या नव्या आर्थिक धोरणाचे म्हणजेच जागतिकीकरणाचे चटके आज मोठया प्रमाणावर अनेक क्षेत्राला जाणवू लागले आहे. अनेक लहान मोठया क्षेत्रावर, उद्योग, शिक्षण, युवक, बेकारी, शेतकरी, कामगार इ. अशा अनेकांवर जागतिकीकरणाचे वाईट परिणाम होत आहे. यामध्ये मानवीहक्कांची सर्रास पायमल्ली होतांना दिसत आहे. याचे स्पष्टीकरण खालील मुद्यावरून स्पष्ट होते.

सामाजिक न्यायाकडे डोळेझाक :– भारतीय राज्यघटनेने या देशातील सर्व नागरिकांना सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे अभिवचन दिले आहे. परंतू कल्याणकारी राज्य संकल्पनेचा त्याग करण्याबरोबर सरकारने सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टाकडे हेतुपूर्वक डोळेझाक चालविली आहे असे म्हणावे लागते. देशातील गोरगरीब जनतेच्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने सरकारने सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरू केली होती. ही व्यवस्था आता कागदावरच शिल्लक राहीली आहे. शिक्षण, आरोग्य या सारख्या सामान्य लोकांच्या दृष्टीने महत्वाच्या गोष्टीवरील खर्चात कपात करण्याचे धोरण त्याने स्विकारले आहे. रोजगार हमी योजनेसारख्या गोरगरीब जनतेच्या कल्याणाच्या योजनांकडेही आता सरकार दुर्लक्ष करू लागले आहे. अशाप्रकारे सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या उद्दिष्टांचा सरकारला विसर पडत चालला आहे.

'कामगार वर्गावर झालेला परिणाम :–जागतिकीकरणाचे भारताच्या उद्योगक्षेत्रावर अनेक अंगांनी परिणाम होत आहेत. उद्योगक्षेत्रातील एक महत्वाचा घटक कामगार वर्ग होय. या घटकावरही जागतिकीकरणाचा परिणाम झाला आहे. जागतिकीकरणामुळे देशात रोजगारवृद्धी होईल असा आशावाद व्यक्त करण्यात आला होता; परंतू प्रत्यक्ष चित्र मात्र वेगळेच दिसू लागले आहे. जागतिकीकरणामुळे देशातील बेरोजगारीत वाढ होऊ लागली आहे. खाजगी उद्योजक व भांडवलदार यांच्या बाबतीत सरकारने उदारतेचे किंबहुना नरमाईचे धोरण स्विकारले असल्यामुळे हा वर्ग आता आपल्या हाती आलेली कुऱ्हाड कामगार वर्गावर चालवू लागला आहे. उद्योगधंद्यांच्या आधुनिकीकरणाच्या नावाखाली उद्योजक कामगार कपातीच्या धोरणाचा सर्रास अवलंब करू लागले आहेत; कामगारांना सक्तीने घरी बसविले जात आहे. स्वेच्छानिवृत्तीचे सोज्वळ कारणपुढे करून कामगारांना त्यांच्या इच्छेविरूद्ध कामावरून काढून टाकले जात आहे. कामगारांच्या वेतनातही मालकवर्ग आपल्या मर्जीप्रमाणे कपात करू लागला आहे. कामगारविषयक कायद्यांतील तरतुदींचे सरळसरळ उल्लंघन केले जात आहे; परंतू कामगारांना सरंक्षण देण्यासाठी पुढाकार घेण्याची इच्छा सरकारला होत नाही.

शेतीक्षेत्रावरील परिणाम :–जागतिकीकरणाच्या धोरणाने भारताचे शेतीक्षेत्रही प्रभावित झाले आहे. जागतिकीरणाचे पुरस्कर्ते असे सांगतात की, जागतिक व्यापार संघटनेच्या या धोरणाचा फायदा भारतीय शेतकऱ्यांनाही होऊ शकतो. भारतीय शेतकऱ्यांनाही आता जागतिक बाजारपेठेच्या स्पर्धेत उतरण्याची संधी

मिळाली आहे. परंतू भारतीय शेती व्यवसायाची अवस्था माहीत असलेल्या कुणालाही या युक्तिवादातील फोलपणा लक्षात आल्यावाचून राहणार नाही. जगातील प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत भारतीय शेतीची उत्पादकता अत्यंत कमी आहे. या देशातील बहुसंख्य शेतकरी अत्यंत गरिबीत जीवन जगत आहेत. अशा शेतकऱ्यांकडून जागतिक स्पर्धेत उतरण्याची अपेक्षा करणे वेडेपणाचे ठरेल.

जागतिकीकरणाच्या धोरणामुळे शेतीव्यवसायापुढे आणखीही काही गंभीर समस्या उभ्या राहिल्या आहेत. जागतिक व्यापार संघटनेने शेतीसाठी दिल्या जात असलेल्या अर्थसाहाय्यात किंवा शेतीवरील अनुदानात कपात करण्याचे बंधन घातले असून भारत सरकार त्यानुसार कृती करू लागले आहे. सरकारच्या या धोरणामुळे गरीब शेतकरी शेती – व्यवसायातुन बाहेर फेकले जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. गरीब शेतकऱ्यांच्या होत असलेल्या उपेक्षेमुळे ते कर्जबाजारी बनू लागले आहेत. देशातील बहुसंख्य शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकले आहेत. त्यातुन शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होत चालली आहे. सरकारने जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारल्यापासुन या देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे, हा योगायोग निश्चितच नाही.

शिक्षणक्षेत्रावरील परिणाम :–देशाच्या शिक्षणक्षेत्रावर जागतिकीकरणाचा होत असलेला परिणाम असा की, आता शिक्षणक्षेत्राचे व्यापारीकरण होऊ लागले आहे. त्यापेक्षाही चिंतेची गोष्ट अशी की, 'व्यापारीकरणातून बाजारीकरणाकडे' या दिशेने शिक्षणाची वाटचाल होऊ लागली आहे. अलीकडील काही वर्षांच्या काळात शिक्षणाचे झपाटयाने खाजगीकरण होऊ लागले आहे. आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर शिक्षणसंस्था स्थापन करणाऱ्या आणि त्यांच्या माध्यमातुन अमाप पैसा जमा करणाऱ्या शिक्षणसम्राटांचे आता पेवच फुटले आहे. अशा शिक्षणसम्राटांजवळ कसलाही धेयवाद नाही की त्यांना कसल्याही नीतिमूल्यांची चाड नाही. आपल्या हाती असलेल्या शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून जास्तीत जास्त संपत्ती जमविण्याचा एकमेव उद्देशाने ते या क्षेत्राकडे वळले आहेत. अशा स्थितीत शिक्षणक्षेत्राचे व्यापारीकरण व बाजारीकरण होणे स्वाभाविक होते.

शिक्षणाचा व्यापारीकरणाचा सर्वाधिक फटका सामान्य परिस्थितीतील विद्यार्थ्यांना बसत आहे. शिक्षण ही आता श्रीमंत किंवा पैसेवाल्या पालकांच्या मुलांची मक्तेदारी बनण्याचा धोका स्पष्टपणे दिसू लागला आहे. सामान्य किंवा गरीब परिस्थितीतील मुलांकडे गुणवत्ता असूनही त्यांना उच्च शिक्षणापासुन वंचित व्हावे लागणार आहे. विशेषतः वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण, व्यवस्थापन इ. अभ्यासक्रम आता केवळ श्रीमंत परिस्थितीतील विद्यार्थ्यांसाठी राखीव करून बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आर्थिक विषमतेत वाढ :–जागतिकीकरणामुळे जरी आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेत काही प्रमाणात सुधारणा झाली असली तरी देशातील वरिष्ठ वर्ग व कनिष्ठ वर्ग यांच्यातील अंतर दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. भारत जागतिक महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत असताना येथील आदिवासी मुले कुपोषणाची बळी ठरत आहेत; गरीब शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि दारिद्र्य रेषेखालील माणसे उद्याच्या विवंचनेत आपला दिवस कसाबसा ढकलण्याच्या प्रयत्नाला लागला आहेत. जागतिक महासत्ता बनू पाहणाऱ्या देशाच्या दृष्टीने ही परिस्थिती खरेच चांगली म्हणता येणार नाही.

निष्कर्ष :–

वरिल काही उदाहरणे बघता जागतिकीकरणाच्या गोंडस नावाखाली देशातील नागरिकांचे मानवी हक्कांचे हनन होतांना दिसत आहे हे स्पष्ट दिसत असुनही मानवी हक्क आयोगासाठी काही उपाययोजना करणार आहे का? त्या करणार असतील तर त्या कशा प्रकारच्या? त्यांची योग्य अंमलबजावणी होईल काय? असे आणि या प्रकारचे अनेक प्रश्न अजुनही अनुत्तरीत आहेत. जागतिकीकरणामुळे अनेक क्षेत्रातील मानवी हक्क संरक्षणात अनेक अडथळे निर्माण झालेले आहेत, व हे अडथळे दूर करण्यासाठी मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन तसेच महत्व यासाठी शैक्षणिक चळवळीची गरज आहे. शिक्षण क्षेत्रातही जागृकता वाढविण्यासाठी प्रसार माध्यमांनी पुढे येणे गरजेचे आहे.

संदर्भ :–

1. पाटील प्रा.बी.बी. चव्हाण, प्रा.सौ. उर्मिला, राज्यशास्त्र पृ. 162
2. राज्यशास्त्र, पृ.148
3. भारताचा इतिहास, ना.सी. दिक्षीत, पृ.23, 24
4. भारतीय संस्कृती और उसका इतिहास, सत्यकेतू विद्यालंकार
5. दैनिक लोकमत, दि. 02/01/2011
6. भारतका राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, अरूण राय
7. मानवी हक्क – प्रा.व्ही.बी. पाटील
8. दैनिक नवराष्ट्र वृत्तपत्र
9. 21 व्या शतकातील बदलते समाजकारण आणि राजकारण – डॉ. अलका देशमुख